असा. क्र. २७६ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, ऑक्टोबर ३१, २००३/कार्तिक ९, शके १९२५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-ब

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ ऑक्टोबर २००३

### आदेश

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८.**

क्रमांक मुद्रांक. २००३/प्र.क्र. १७५/म-१.—ज्याअर्थी, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा ६०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे ) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, लोकहितास्तव तसे करणे आवश्यक आहे अशी खात्री पटल्यामुळे, महाराष्ट्र शासन, याद्वारे स्थानिक प्राधिकरणाने तयार केलेल्या विकास नियंत्रण नियमानुसार हस्तांतरणीय विकास अधिकारांच्या मंजुरी अनुसार किंवा यथास्थिती, वाढीव चटई क्षेत्र निर्देशंकानुसार सार्वजनिक सुखसोयी देण्यासाठी स्थावर मालमत्तेचे विनामूल्य हस्तांतरण किंवा विकास किंवा बांधकाम याचा अंतर्भाव असलेल्या, राज्यातील कोणत्याही महानगरपालिकेच्या किंवा नगरपरिषदेच्या (यात यापुढे ज्यांचा निर्देश संक्षिप्तपणे " स्थानिक प्राधिकरण " असा करण्यात आला आहे) नावाने कोणत्याही व्यक्तीने निष्पादित केलेल्या संलेखावर, उक्त अधिनियमाची अनुसूची-एक मधील अनुच्छेद २५ च्या खंड (ब) अन्वये आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्क माफ करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रमाकान्त अस्मर,**
शासनाचे सह सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 31st October 2003

## Order

BOMBAY STAMP ACT, 1958.

No. MUDRANK. 2003/C.R. 175/M-1.—In exercise of the'powers con-ferred by clause *(a)* of section 9 of the Bombay Stamp Act, 1958 (Bom. LX of 1958), (hereinafter referred to as "the said Act") the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary to do so in the public interest, hereby remits the stamp duty chargeable under clause (*b*) of article 25 of the Schedule-I of the said Act on the instruments executed by any person in favour of any Municipal Corporation or Municipal Council in the State (hereinafter jointly referred to as "the local authority") involving free of cost transfer of immovable property or development or construction for producing public amenities against the sanction of Transferable Development Rights or additional Floor Space Index, as the case may be, as per the Development Control Rules prepared by the local authority.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAMAKANT ASMAR,

Joint Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई